VOL- VII ISSUE- XII DECEMBER 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# महात्मा फुले यांचे स्त्रीविषयक कार्य : एक समाजशास्त्रीय अध्यायन

**प्रा. रामराव चव्हाण**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव
ता. चाकूर जि. लातूर ( महाराष्ट्र )

**प्रस्तावना:-**

भारत देशाची संस्कृती ही पुरुषप्रधान असल्यामुळे पारंपारिक समाजव्यवस्थेपासून आजतागायत स्त्रियांना दुय्यम दर्जाचे स्थान असल्याचे आढळून येते. प्राचीन भारतीय संस्कृतीचा विचार केला तर 'ऋग्वेद काळात' स्त्रियांना मानाचे स्थान होते. उत्तर वैदिक काळामध्ये त्यांच्या दर्जात घसरण झाली.त्यानंतर पुढे मध्ययुगीन म्हणजेच मुस्लिम राजवटीत स्त्री वर्गावर अनेक प्रकारची सामाजिक व धार्मिक, अनिष्ट बंधने लादण्यात आली होती. म्हणून स्त्रियांची स्थिती फारच वाईट होती. समाजव्यवस्थेत व कुटुंबात स्त्रियांना अगदी 'हीन' दर्जा होता. त्याकाळी स्त्रियांचे कार्यक्षेत्र केवळ 'चूल आणि मूल' यापुरतेच मर्यादित होते. त्याचबरोबर स्त्री म्हणजे सुखाची व उपभोगाची वस्तू आहे. अशी समजूत तत्कालीन समाजात प्रचलित होती. कारण त्याकाळी स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. स्त्रीला शिक्षण दिले तर ती वाईट मार्गाला लागेल व संसाराचे वाटोळे करील, असे मानले जात होते. त्यामुळे महिलांवरती निरनिराळे जाचक, सामाजिक व धार्मिक बंधने लादण्यात आलेली होती. त्यावेळी समाजात स्त्रियांवर होणारे अन्याय, आत्याचार थांबले पाहिजे अशी महत्त्वाची भूमिका महात्मा फुलेंनी अगदी तळमळीने घेतली.

एकविसाव्या शतकात होऊन गेलेल्या अनेक समाजसुधारकांपैकी महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले यांचे स्त्रीविषयक कार्य अतिशय उल्लेखनीय आहे. महात्मा फुले हे बोलके समाजसुधारक नसून कर्ते समाजसुधारक होते. त्यांनी भारतीय समाजातील स्त्रियांच्या उद्धारासाठी अनमोल कार्य केले. सामाजिक प्रगती आणि विकासाच्या दृष्टिकोनातून त्यांनी शिक्षणाला फार महत्त्व दिले. शिक्षणाचे मानवी जीवनातील महत्त्व सांगताना महात्मा फुले म्हणतात. "विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले". यावरून असे स्पष्ट होते की, भारतीय समाजाच्या जडणघडणीमध्ये शिक्षणाची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. मानवाला आपला विकास व प्रगती घडून आणण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे. परंतु पूर्वी समाजव्यवस्थेमध्ये शूद्रांना व स्त्रियांना शिक्षण घेण्याचा हक्क नव्हता. म्हणून स्त्रीयांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले होते. भारतीय समाजात महात्मा फुलेंनी सर्वप्रथम शिक्षणाच्या माध्यमातून महिलाविषयक कार्याची चळवळ सुरू केली. त्यामुळे महात्मा फुले यांच्या स्त्रीविषयक कार्याचा समाजशास्त्रीय दृष्टीने अध्यायन प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:-**

१) महात्मा फुले यांच्या स्त्रीविषयक कार्याचा आढावा घेणे.

२) महात्मा फुले यांनी महिलांसाठी केलेल्या सुधारणेचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतकृत्ये:-**

१) महात्मा फुले यांच्या काळात स्त्रीयांवर अनेक प्रकारची सामाजिक बंधने होती.

२) महात्मा फुले यांनी स्त्रियांच्या उद्धारासाठी केलेल्या कार्यामुळे स्त्रियांच्या दर्जात स्थित्यांतरे होत आहेत.

**संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत शोधनिबंधात वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केलेला आहे. तसेच तथ्य संकलनासाठी संदर्भ ग्रंथ, पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके व इंटरनेट इत्यादी दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आला आहे.

**महात्मा ज्योतिराव फुले यांचे स्त्रीविषयक कार्य:-**

महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्त्रियांच्या उद्धारासाठी केलेल्या कार्याचा सविस्तरपणेआ पुढीलप्रमाणे घेण्यात आलेला आहे.

**१) स्त्री शिक्षणास प्रोत्साहन-**

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या काळात स्त्रियांची स्थिती अतिशय वाईट स्वरूपाची होती. भारतीय समाजात स्त्रियांवर अनेक सामाजिक व धार्मिक बंधने होती. शुद्राप्रमाणेच स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. अशा स्थितीत स्त्रिया शिक्षणापासून वंचित होत्या. त्यावेळी स्त्री शिक्षणाचे जनक महात्मा फुलेंनी स्त्रियांना गुलामगिरीतून बाहेर काढण्यासाठी सर्व स्त्रियांना शिक्षण देण्याचा धाडसी व क्रांतिकारक असा निर्णय घेतला. स्त्री शिक्षणाच्या संदर्भात महात्मा फुले म्हणतात "जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धारी" त्यामुळेच त्यांनी स्त्रियांच्या उद्धाराचे व त्यांचे दु:ख निवारण करण्याचे कार्य हाती घेतले. शिक्षणाने समाजाचा आणि राष्ट्राचा सर्वांगीण विकास होतो. म्हणून स्त्रियांना शिक्षण देणे फार आवश्यक आहे, असे महात्मा फुलेंना वाटत होते. त्यामुळे इ. स. १८४८ ला पुणे येथे बुधवार पेठेत असणाऱ्या तात्यासाहेब भिडे यांच्या वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. त्यावेळी उच्चवर्णीयांनी महात्मा फुले यांच्या या कार्याला कडाडून विरोध केला होता. परंतु महात्मा फुले यांचे कार्य चालूच राहिले. आपली पत्नी 'सावित्रीबाईंना' त्या शाळेत शिक्षिका व मुख्याध्यापिका म्हणून नेमणूक केली. त्याप्रसंगी समाजातील धर्ममार्तंडांनी क्रांतीज्योती सावित्रीबाईच्या अंगावर शेन व दगड गोट्यांचा मारा केला. पण फुले दांपत्य अजिबात डगमगले नाही. बहुजन समाजातील स्त्रिया शिकल्या पाहिजे, हा एकमेव उद्देश त्यांच्यासमोर होता. म्हणून महात्मा फुले हे देशातील स्त्री शिक्षणाचे खरे जनक ठरतात. त्यांनी हाती घेतलेल्या स्त्रीशिक्षण कार्यामुळेच सद्यस्थितीत स्त्रियांच्या जीवनात परिवर्तन होत आहे.

**२) विधवा पुनर्विवाह प्रसंग-**

तत्कालीन भारतीय समाजात विधवा स्त्रियांना पुनर्विवाह करण्याचा अधिकार नव्हता. बालविवाहाच्या प्रथेमुळे 'बाल विधवांची' संख्या वाढत होती. विधवा स्त्रियांना केसवपणसारख्या अत्यंत क्रूर अशा प्रथेमुळे दु:खी व उपेक्षित जीवन जगावे लागत होते. विधवा स्त्रियांना सामाजिक व धार्मिक समारंभात सहभागी होता येत नव्हते. अशा परिस्थितीत महात्मा फुलेंनी स्त्रियांवरील अन्याय दूर करण्यासाठी समाजात विधवा पुनर्विवाहाची प्रथा सुरू करण्यासाठी चळवळ सुरू केली. त्यांच्या या अथक प्रयत्नांमुळेच 8 मार्च 1864 साली पुण्यात गोखल्यांच्या बागेत एका सेनवी जातीच्या अठरा वर्षाच्या विधवेचा पुनर्विवाह त्याच जातीतील एका

विधुरासोबत घडून आणला होता. त्यामुळे महात्मा फुलेंच्या स्त्रीविषयक कार्यामुळे विधवा पुनर्विवाह मोठ्या प्रमाणात होत आहेत.

**३) बाल हत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना-**

भारतीय समाजात पूर्वी बालविवाह, जरठविवाह, सतीप्रथा इत्यादी अनेक प्रकारच्या अनिष्ठ प्रथा रूढ होत्या. बालविवाह व जरठ विवाहामुळे समाजव्यवस्थेत बाल विधवांच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत होती. त्याकाळात विधवांचे मोठे प्रश्न होते, त्यांना समाजात कुटुंबात,मान नव्हता. त्यांचा अनेक मार्गाने समाजात छळ होत असे. अनेक विधवा स्त्रिया लैंगिक अत्याचारांना बळी जात होत्या. अशातून त्यांना गर्भधारणा होऊन पुढे त्या आपल्या पोटातील गर्भाची हत्या करत किंवा स्वतःचे आयुष्य संपवत असे. ही अतिशय गंभीर बाब महात्मा फुले यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी इ.स.वी.सन १८६३ साली बाल हत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली.त्यामध्ये अनेक महिला,बालके दाखल झाली होती,त्यातच काशिबाई नावाची महिला ही दाखल झाली. पुढे ती बाळंत झाल्यावर तिच्या मुलाला फुले दाम्पत्याने दत्तक घेतले.अशापद्धतीने 'बाल हत्या' प्रतिबंधक गृहातील मुलांची सेवा करण्याचे महान कार्य महात्मा फुले आणि सावित्रीबाई यांनी केले.

**4) बहुपत्नी विवाहाला विरोध-**

महात्मा फुले यांच्या काळात भारतीय समाजव्यवस्थेत 'बहुपत्नीत्वाची' प्रथा मोठ्या प्रमाणात प्रचलित होती. समाजातील श्रीमंत व ब्राह्मण लोकांना एकापेक्षा अनेक स्त्रियांशी विवाह करण्याचा हक्क होता. कारण पहिली पत्नी जिवंत असताना सुद्धा दुसरे लग्न करणे ही गोष्ट योग्य नाही. म्हणून महात्मा फुले म्हणतात की, "पुरुषांना चार बायका करण्यास परवानगी आहे. तर मग स्त्रियांनी चार-चार लग्नाचे नवरे केल्यास चूक कशी होईल?" हा खरा महात्मा फुले यांचा मुख्य प्रश्न होता. फुले दाम्पत्यांना अपत्य नसताना सुद्धा त्यांनी दुसरे लग्न करण्यास नकार दिला. समाजातील सर्व स्त्री-पुरुष एक समान असून लग्नाच्या बाबतीत होत असलेल्या भेदभावामुळे महात्मा फुलेंनी 'बहुपत्नी विवाहाच्या' प्रथेला विरोध दर्शविला होता.

**5 बालविवाह व जरठ विवाहाला विरोध-**

पूर्वीच्या काळी भारतीय समाजात बालविवाह, जरठविवाह यासारख्या अनिष्ट प्रथा प्रचलित होत्या. विवाहाच्या वेळी मुलीचे वय आठ वर्ष, मुलाचे वय बारा वर्षाचे होते. बालविवाहामुळे बाल विधवांची संख्या दिवसेंदिवस वाढत होती. त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. तसेच जरठविवाह म्हणजे आठ ते नऊ वर्षाच्या मुलीचा विवाह 80 वर्ष वयाच्या पुरुषांशी केले जाई. महात्मा फुलेंच्या काळात अशा प्रकारच्या विजोड विवाहाची प्रथा होती. त्यामुळे त्यांनी बालविवाह प्रमाणेच जरठ विवाह प्रथेला कडाडून विरोध केला. याशिवाय भारतीय समाजात पतीच्या निधनानंतर विधवेचे केशवपन करणे, विधवेने सती जाणे, त्याचबरोबर वाघ्या आणि मुरुळी अशा विविध प्रकारच्या अनिष्ट प्रथा समाजात अस्तित्वात होत्या. अशा सर्व अनिष्ट प्रथांना पायबंद घालून स्त्रियांच्या उद्धारासाठी महात्मा फुले यांनी अनमोल असे कार्य केले आहे. त्यामुळे त्यांना स्त्रियांचे कैवारी म्हटले जाते.

**निष्कर्ष :-**

महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्त्रियांच्या उद्धारासाठी स्त्री शिक्षणाला महत्त्वपूर्ण मानले. त्यामुळेच आधुनिक काळात स्त्रियांच्या विविध दर्जात स्थित्यंतरे झालेली दिसून येत आहेत. महात्मा फुलेंच्या काळात समाजातील स्त्रियांची अवस्था अत्यंत वाईट होती. तत्कालीन समाजात स्त्रियांवर

अन्याय करणाऱ्या अनेक प्रकारच्या अनिष्ट असलेल्या प्रथेला पायबंद घालण्याचा व स्त्रियांच्या जीवनात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न महात्मा फुले यांनी केला आहे. त्यामुळेच आज स्त्रियांच्या दर्जात दिवसेंदिवस स्थित्यंतरे होत आहेत. महात्मा फुलेंच्या स्त्रीविषयक क्रांतिकारक कार्यामुळे ते स्त्रियांचे उद्धारक व कैवारी बनले.

**सारांश :-**

भारतीय समाजातील पहिले समाजसुधारक व थोर शिक्षणतज्ञ महात्मा ज्योतिराव फुले यांनी विविध जाती, जमातीच्या स्त्रियांना शिक्षणाची संधी निर्माण करुन दिली. त्यामुळे स्त्रियांच्या उद्धाराकरिता फुले यांनी केलेले कार्य कौतुकास्पद व अभिमानास्पद आहे. म्हणून ते स्त्रियांचे पहिले उद्धारक व कैवारी आहेत.

**संदर्भसूची :-**

१) धनंजय कीर - महात्मा ज्योतिराव फुले.
२) डॉ.अनिल कठारे - आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास.
३) डॉ. संभाजी खराट - सत्यशोधक चळवळ वाटचाल आणि चिकित्सा.
४) डॉ. साहेबराव गाठाळ - आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास.
५) इंटरनेट